19 JAN 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञानाचा खजिना शिवाजी विद्यापीठाला

## अखेरची इच्छा : विद्वतेची उंची सांगणारे आहे ज्ञानभांडार

**विश्वास पाटील**
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ज्येष्ठ नेते प्रा. एन. डी. पाटील यांचा ज्ञानाचा खजिना त्यांच्या अंतिम इच्छेनुसार शिवाजी विद्यापीठाकडे सुपूर्द करण्यात येणार आहे. सरोज उर्फ माई पाटील यांनीच मंगळवारी ही गोष्ट स्पष्ट केली. त्यांचा अर्थकारण व समाजकारणाचा विशेष अभ्यास होता. त्यामुळे त्यासंबंधीचे नवीन ग्रंथ आणून ते वाचत होते. हा सगळा साहित्य खजिना संग्रहालय रूपात जतन करण्यासारखा आहे. तो कॉलेजपेक्षा विद्यापीठाकडे गेल्यास विविध विद्याशाखांतील विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल, अशी त्यामागील धारणा आहे.

माई सांगत होत्या, या घरात माझ्यादृष्टीने तीनच गोष्टी मोलाच्या होत्या. त्यातील माझा माणूस होता तो निघून गेला. आता राहिले काय तर पुस्तके आणि पुरस्कार. माझ्या घरी कुणी इन्कमटॅक्सवाला धाड टाकायला आला तर त्याला पुस्तकांशिवाय दुसरं काय मिळणार नाही, असेही प्रा. पाटील गमतीने म्हणायचे. हे सगळे संचित आता नव्या पिढीला त्यांच्या कर्तृत्वाची गाथा सांगत राहील.



पवार यांच्या घरी किमान चार हजारांहून जास्त पुस्तकांचे ग्रंथालय आहे. माझ्या मृत्यूनंतर हा ज्ञानाचा खजिना घरी ठेवू नकोस, तो समाजाच्या उपयोगीच आला पाहिजे, असे प्रा. पाटील यांनी बजावून ठेवले होते. त्यानुसार ही त्यांची खरी संपत्ती समाजासाठीच दिली जाणार आहे. रुईकर कॉलनीतील घरांतील दिवाणखान्यात महत्त्वाची पुस्तके, प्रा. पाटील यांना मिळालेली मानपत्रे, सन्मानचिन्हे, डी.लिट. ठेवली आहेत. त्याकडे पाहिले की, प्रा. पाटील यांच्या विद्वतेची उंची लक्षात येते. विश्रांतीच्या खोलीत ते कायमपणे काही ना काही वाचत बसलेले असत. सहकारी साखर कारखाने फुकापासरी विक्रीला काढून तेच कारखाने काही राजकीय नेत्यांनी स्वस्तात घशात घातल्याचे प्रकरण उघडकीस आल्यावर त्यांनी अशा सर्व कारखान्यांची माहिती मिळवली होती. सांगली जिल्ह्यातील तासगाव कारखान्याच्या खासगीकरणाविरोधात तर त्यांनी तेथील स्थानिक नेतृत्वाची दहशत मोडून लढा उभारला होता. अशी अनेक प्रश्नांतील महत्त्वाची कागदपत्रेही त्यांच्याकडे आहेत.

तरुण भारत

# एन. डी. पाटील यांच्याजवळील पुस्तकठेवा विद्यापीठाला भेट देणार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

कष्टकरी, शोषितांचा बुलंद आवाज प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या निधनाच्या दुसऱ्या दिवशीही (मंगळवारी) मंत्री, लोकप्रतिनिधी, नेतेमंडळीसह शैक्षणिक क्षेत्रातील पदाधिकारी व विविध संस्था-संघटनांच्या कार्यकर्त्यांनी एन.डी. पाटील यांच्या रुईकर कॉलनीतील घरी जाऊन पत्नी सरोज (माई) पाटील व कुटुंबीयांचे सांत्वन केले. सांत्वनादरम्यान सरोजमाई यांनी एनडींनी आयुष्यभर जपून ठेवलेली बहुसंख्य पुस्तकं शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयाला भेट देणार असल्याचे सांगितले.

मंगळवारी दुपारी एन. डी. पाटील यांच्या पार्थिवावर कसबा बावडा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार झाल्यानंतर सर्व कुटुंबीय रुईकर कॉलनीतील घरी परतले होते. यादरम्यान, दुपारी उपमुख्यमंत्री अजित पवार हे एनडींच्या निवासस्थानी दाखल झाले. सुमारे २० मिनिटे झालेल्या चर्चेत अजित पवार यांनी एनडींच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत सरोजमाई यांना तब्येतीच काळजी घ्या, असे सांगितले. जलसंपदामंत्री जयंत पाटील, ग्रामविकासमंत्री

- **सरोजमाई यांची माहिती**
- **सांत्वनासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांची रिघ**



हसन मुश्रीफ, सहकार राज्यमंत्री विश्वजित कदम यांनीही एनडी यांच्या घरी जात सरोजमाई, चिरंजीव मुलगा सुहास व प्रशांत यांचे सांत्वन केले. तसेच त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करुन एनडींच्या आठवणींना उजाळा दिला.

आमदार रोहित पवार, आमदार जयंत आसगावकर, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन अनिल पाटील, हुतात्मा साखर कारखान्याचे चेअरमन वैभव नायकवडी यांच्या पत्नी नंदिनी नायकवडी, माजी महापौर आर. के. पोवार, जिल्हा राष्ट्रीय तालीम संघाचे अध्यक्ष व्ही. बी. पाटील, सांगलीचे उपमहापौर दिग्विजय सूर्यवंशी यांच्यासह मान्यवरांनी सरोजमाईंची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

19 JAN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नाट्यशास्त्र विभागाचे प्रवेशद्वार 'म्युरल्स'ने सजले

## कोल्हापुरातील कलाकारांचा सन्मान; लॉकडाउन काळात पालटले रुपडे




कोल्हापूर : म्युरलने नटलेला शिवाजी विद्यापीठाचा संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग.

**संदीप खांडेकर :** सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग 'म्युरल'ने नटला आहे. कलेचे आश्रयदाते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्यासह कोल्हापुरातील ९ कलाकारांचा त्यात समावेश आहे. लॉकडाउन काळात विद्यापीठाचे दरवाजे बंद राहिल्याने अधिविभागाचे रुपडे पडद्याआड होते. आता, मात्र म्युरल्सने नटलेला अधिविभाग लक्ष वेधून घेत आहे.

विद्यापीठातील तळ्याच्या काठी असलेल्या अधिविभागात संगीत व नाट्यशास्त्रविषयक शिक्षण दिले जाते. कोल्हापूरच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची जपणूक करत कलाकारांना घडवणारा विभाग, अशी त्याची ओळख आहे. अधिविभागाची स्थापना १९८४ ला झाली असून, डॉ. भारती वैशंपायन, डॉ. शुभदा वायंगणकर, डॉ. एन. व्ही. चिटणीस यांनी विभागप्रमुख पदाची जबाबदारी सांभाळली. डॉ. अंजली निगवेकर आता विभागप्रमुख म्हणून काम पाहत आहेत.

हा विभाग सुसज्ज करण्याचे ठरल्यानंतर म्युरलची कल्पना पुढे आली. कोरोनाचा कहर ओसरल्यावर २०२० ला त्याचे काम सुरू झाले. कलेच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिलेल्या कलाकारांना त्यात स्थान देण्यात आले. कथ्थक नृत्य, लावणी, वासुदेवाच्या विविध हालचाली, काही वाद्ये विभागाच्या इमारतींवर साकारण्यात आली. इमारतीच्या दोन्ही बाजूंच्या चौकोनांमध्ये लोकसंगीत, नाट्य, विविध वाद्ये, चित्रकला यांची पोस्टर्स करण्याचे काम प्रसिद्ध कलाकार अशोक सुतार यांनी केले.

**"कोल्हापुरातील नऊ कलाकार नवग्रह, मध्यभागी कलेची पृथ्वी, एका बाजूला राजर्षी छत्रपती शाहू महाराज म्हणजे कलेचे आश्रयदाते म्हणजेच सूर्य, अशी म्युरलची कल्पना आहे. म्युरलसदृश पोस्टर्समुळे अधिविभाग लक्षवेधी झाला आहे.**

**- डॉ. विनोद ठाकूर-देसाई, संगीत व नाट्यशास्त्रविषयक.**

19 JAN 2022

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# घाळी महाविद्यालय सौरउर्जेवर

## गडहिंग्लजमध्ये उद्घाटन; १५ किलोवॉट क्षमतेचा प्रकल्प

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. १८ : येथील डॉ. घाळी महाविद्यालयात १५ किलोवॉट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प उभारला आहे. यामुळे महाविद्यालय आता सौरउर्जेवर आले. या प्रकल्पाचे उद्घाटन विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांच्या हस्ते झाले. शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर कार्यक्षेत्रात सौरऊर्जा प्रकल्प उभारणारे हे पहिलेच महाविद्यालय असल्याचे सांगण्यात आले.

डॉ. घाळी म्हणाले, की वाढत्या औद्योगिकरणात अपारंपारिक स्त्रोत कमी पडत आहेत. जागतिक तापमान वाढ व प्रदूषणात वाढ होत आहे. ती थांबवायची असेल तर सौर उर्जा प्रकल्पासारखे पारंपारिक उर्जा स्त्रोत निर्माण करायला हवेत. सनलीश एलर्जी कंपनीचे कार्यकारी अध्यक्ष अवधूत जोशी यांनी सौर उर्जा प्रकल्पाचे महत्व सांगितले. प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील यांनी प्रदूषण विरहीत उर्जा निर्मितीचा प्रकल्प उभारुन शैक्षणिक क्षेत्रात महाविद्यालयाने आपला नावलौकीक वाढविल्याचे सांगितले. श्री. जोशी, हर्षिक हरळीकर यांचा सत्कार झाला. प्रा. शिवानंद मस्ती, सचिन जानवेकर, गुरुलिंग खंदारे, संजय हत्ती यांचाही सहकार्याबद्दल सत्कार झाला. कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अरविंद कित्तूरकर, सचिव ॲड. बी. जी. भोसकी, सहसचिव गजेंद्र बंदी, संचालक महेश घाळी, डॉ. शिवकुमार कोल्हापुरे, किशोर हंजी उपस्थित होते. समन्वयक डॉ. शिवानंद मस्ती यांनी स्वागत केले. प्रा. सचिन जानवेकर यांनी सूत्रसंचालन केले. पर्यावरण विभागप्रमुख प्रा. अनिल मगर यांनी आभार मानले.



**गडहिंग्लज : घाळी महाविद्यालयात सौरऊर्जा प्रकल्प उद्घाटनप्रसंगी डॉ. सतीश घाळी, अरविंद कित्तूरकर, डॉ. शिवकुमार कोल्हापुरे, ॲड. बी. जी. भोसकी, डॉ. मंगलकुमार पाटील आदी.**

### अडीच लाखांची बचत

आजपर्यंत महाविद्यालयाला महावितरण कंपनीकडून वीजपुरवठा होता. आता सौरऊर्जा प्रकल्प उभारल्याने वीज आणि वीजबिलात बचत होणार आहे. संपूर्ण महाविद्यालय सौरउर्जेवर उजळणार असल्याने महाविद्यालयाच्या वीजबिलाच्या खर्चात अडीच लाखांची बचत होणार असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले.